दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

बलरामपूरमध्ये दाट धुक्याचा कहर! 3 तरुणांचा मृत्यू

लखनऊ : उत्तर प्रदेशातील बलरामपूर जिल्ह्यात दाट धुक्यामुळे झालेल्या भीषण रस्ते अपघातात 5 जणांचा मृत्यू झाला असून 2 जण गंभीर जखमी झाले आहेत. उत्तरौला भागातील अक्सीबरहरा गावाजवळ हा दुर्दैवी प्रकार घडला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. दाट धुक्याची चादर पसरलेली असताना दोन मोटारसायकलींची समोरासमोर धडक झाल्याने हा मोठा अनर्थ घडल्याचे प्राथमिक माहितीतून समोर आले आहे.

वडापाव विकणाऱ्या दाम्पत्याची मोठी फसवणूक

कल्याण : कल्याणमध्ये वडापावचा व्यवसाय करणाऱ्या एका दाम्पत्याला सरकारी नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवून 40 लाखांहून अधिक रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. मुंबई महापालिका (BMC) आणि सार्वजनिक बांधकाम विभागात (PWD) नोकरी लावून देण्याचे आश्वासन देत तिघांनी दाम्पत्याकडून एकूण 40,49,445 रुपये घेतल्याचा आरोप आहे. याप्रकरणी खडकपाडा पोलिसांनी तिघांविरोधात गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.

छत्रपती संभाजीनगर ❀ शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : २०६ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

सुपर हाय-स्पीड बीएलडीसी प्लस फॅन सादर

नवी दिल्ली : हॅवेल्स इंडिया लिमिटेडने सीलिंग फॅन्सची नवीन श्रेणी सादर केली आहे. यामध्ये भारतातील पहिला सुपर हाय-स्पीड बीएलडीसी प्लस, सायलेंट एअर मॅक्स बीएलडीसी प्लस आणि एजंटिक एआय फॅनचा समावेश आहे. या फॅन्समध्ये ६५ टक्क्यांपर्यंत वीज बचत, ५-स्टार ऊर्जा रेटिंग आणि स्मार्ट कंट्रोल सुविधा आहेत. एजंटिक एआय फॅन १० हून अधिक भारतीय भाषांमध्ये संवाद साधण्यास सक्षम असून, ग्राहकांना आधुनिक आणि वैयक्तिक अनुभव देणार आहे.

निवा बूपाकडून 'मेरिडियन' सादर;

मुंबई : निवा बूपा हेल्थ इन्शुरन्सने बूपा ग्लोबलच्या सहयोगाने आज मेरिडियन या प्रमुख आंतरराष्ट्रीय खासगी वैद्यकीय विमा (इंटरनॅशनल प्रायव्हेट मेडिकल इन्शुरन्स – IPMI) योजनेच्या लाँचची घोषणा केली. जगभरात प्रवास व वास्तव्य करणारे व्यावसायिक, उद्योग प्रमुख, सीएक्सओ, अनिवासी भारतीय (NRI) आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर जोडलेली कुटुंबे, जी जगात कुठेही असली तरी सर्वसमावेशक आरोग्य संरक्षण आणि सर्वोत्तम वैद्यकीय कौशल्यापर्यंत पोहोच शोधतात, त्यांच्यासाठी ही योजना तयार करण्यात आली आहे.

किया सोरेंटो ने 4,500 होलसेल विक्रीचा टप्पा ओलांडला

नवी दिल्ली, : किया इंडिया ने आज जाहीर केले की आपल्या प्रीमियम एसयूव्ही किया सोरेंटो ने सप्टेंबर 2026 मध्ये बुकिंग सुरू झाल्यापासून 4,500 होलसेल युनिट्सचा टप्पा ओलांडला आहे. प्रगत तंत्रज्ञान, इलेक्ट्रिफाइड परफॉर्मन्स, प्रीमियम आराम आणि सर्वसमावेशक सुरक्षा यांचा मेळ घालणाऱ्या सोरेंटो च्या वेगळेपणाला बाजारातून मिळालेला उत्साहवर्धक प्रतिसाद या टप्प्यातून दिसून येतो. तिचे आकर्षण आणखी वाढवत, किया सोरेंटो च्या खात्रीशीर पुनर्खरेदी कार्यक्रमअंतर्गत तीन वर्षांनंतर 70% पर्यंत उद्योगातील सर्वोत्तम सुनिश्चित अवशिष्ट मूल्य देते; हे लागू असलेल्या मायलेज मर्यादा आणि कार्यक्रमाच्या अटी व शर्तींच्या अधीन आहे.

बीएलडीसी प्लस फॅन सादर

नवी दिल्ली : भारतीय फॅन उद्योगात नाविन्यपूर्ण उत्पादने सादर करण्याचा वारसा पुढे नेत हॅवेल्स इंडिया लिमिटेडने सीलिंग फॅन्सची नवीन श्रेणी बाजारात आणली आहे. कार्यक्षमता, ऊर्जा बचत, स्मार्ट तंत्रज्ञान आणि आराम यांचा उत्तम समन्वय साधणाऱ्या या श्रेणीमध्ये भारतातील पहिला 'सुपर हाय-स्पीड बीएलडीसी प्लस फॅन', ड्युअल कंट्रोल सुविधेसह 'सायलेंट एअर मॅक्स बीएलडीसी प्लस ' फॅन आणि भारतातील पहिला 'एजंटिक एआई फॅन' यांचा समावेश आहे.

जळगावमध्ये स्वच्छता अभियान

जळगाव : मलाबार ग्रुपच्या ३४ व्या स्थापना दिनानिमित्त जळगावमधील गणेश घाट आणि मेहरूण तलाव परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. महानगरपालिका आणि नगरपालिकेच्या सहकार्याने आयोजित या मोहिमेत मलाबार गोल्ड अँड डायमंड्सचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. देशभरातील ९,००० हून अधिक कर्मचाऱ्यांनी या उपक्रमात सहभाग नोंदवला.

लवकर निदान आणि उपचार आवश्यक

छत्रपती संभाजीनगर : लठ्ठपणा हा केवळ चुकीच्या आहाराचा किंवा जीवनशैलीचा परिणाम नसून जैविक, अनुवांशिक आणि पर्यावरणीय घटकांशी संबंधित दीर्घकालीन आजार आहे. त्यामुळे त्याचे वेळीच निदान आणि योग्य उपचार आवश्यक असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले. डॉ. हेमंत फताळे, एंडोक्राइनोलॉजिस्ट आणि डायबेटोलॉजिस्ट, महाराष्ट्र एंडोक्राइन सोसायटी यांनी लठ्ठपणाबाबत जनजागृती आणि वैद्यकीय सल्ल्याचे महत्त्व स्पष्ट केले.



न्यायालयाची स्थगिती असतानाही उरण-कोप्रोलीत जमीन मोजणीचा प्रयत्न!; बेस्ट रोडवेजचे मालक जयकुमार गुप्तांविरोधात शेतकऱ्यांचा एल्गार

ऍडव्होकेट पर्जन्य म्हात्रे यांच्यासह शेतकऱ्यांनी केला विरोध; बेकायदा रस्ते, वेअरहाऊस आणि उभी केलेली वाहने हटवण्याची मागणी

उरण दि १९(विठ्ठल ममताबादे) : उरण तालुक्यातील कोप्रोली गावात बेस्ट रोडवेज कंपनीचे मालक जयकुमार गजानन गुप्ता यांनी केलेल्या जमीन मोजणीच्या मागणीवरून शेतकरी आक्रमक झाले आहेत. जमिनीच्या मोजणीसाठी शासकीय अधिकारी गावात दाखल होताच शेतकऱ्यांनी एकत्र येत जोरदार विरोध केला. संबंधित जमीन प्रकरण न्यायप्रविष्ट असून न्यायालयाची स्थगिती असल्याने मोजणी करता येणार नाही, अशी भूमिका घेत शेतकऱ्यांनी मोजणीची कार्यवाही रोखली. मोजणी करायची असल्यास न्यायालयाचा आदेश घेऊनच यावे, असे ऍडव्होकेट पर्जन्य म्हात्रे यांच्यासह शेतकऱ्यांनी ठणकावून सांगितले. शेतकरी अथवा ग्रामस्थांच्या सुविधेसाठी रस्ते बनवण्यास शेतकऱ्यांची हरकत नाही मात्र व्यावसायिक कारणास्तव







बनवण्यात येणारे बेकायदेशीर रस्त्यांना शेतकऱ्यांनी कडाडून विरोध केला आहे.

बेस्ट रोडवेज कंपनीचे मालक जयकुमार गजानन गुप्ता गेल्या २० वर्षांपासून शेतकऱ्यांवर अन्याय करत असल्याचा आरोप आहे. तब्बल १५ हून अधिक शेतकऱ्यांनी त्यांच्याविरोधात न्यायालयात दावे दाखल केले आहेत. पनवेल आणि उरण दिवाणी न्यायालयाचे आदेश असतानाही दोन प्रकरणांत आदेश झुगारून रस्त्यांचे काँक्रीटीकरण आणि गोडाऊन उभारण्यात आल्याचा गंभीर आरोप ऍडव्होकेट पर्जन्य म्हात्रे यांच्यासह शेतकऱ्यांनी केला आहे. अनधिकृत वेअरहाऊसमध्ये एखादी दुर्घटना अथवा अनुचित प्रकार घडल्यास त्याला जबाबदार कोण असाही सवाल शेतकरी विचारत आहेत.

शेतकऱ्यांच्या पिकत्या जमिनीत भराव टाकून काँक्रीटचे रस्ते तयार करण्यात आले. यासाठी आवश्यक परवानग्या आणि रॉयल्टी भरली नसल्याचाही आरोप ऍडव्होकेट पर्जन्य म्हात्रे यांच्यासह शेतकऱ्यांनी केला आहे. शिवाय शेतकऱ्यांच्या जागेत कंटेनर आणि टेम्पो उभे करून जमिनीचा वापर केला जात असल्याने शेतीचे नुकसान होत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. याबाबत उरण पोलीस ठाणे, एसीपी, डीसीपी कार्यालय, जिल्हाधिकारी, एमएमआरडीए आणि तहसीलदार यांच्याकडे वारंवार तक्रारी करून तसेच मोर्चे काढूनही कारवाई झाली नसल्याची नाराजी शेतकऱ्यांनी व्यक्त केली. मात्र, बेस्ट रोडवेजचे मालक जयकुमार गुप्ता यांच्या एका अर्जावर पोलीस यंत्रणा तत्पर होते, अशी टीकाही आंदोलकांनी केली.

न्यायालयाचा आदेश मिळेपर्यंत जमीन मोजणी करू नये, तसेच शेतकऱ्यांच्या जमिनीतील बेकायदा रस्ते, वेअरहाऊस आणि उभी केलेली वाहने तातडीने हटवावीत, अशी मागणी आता ऍडव्होकेट पर्जन्य म्हात्रे यांच्यासह कोप्रोलीतील शेतकऱ्यांनी केली आहे.

राज्यातील दुष्काळी तालुक्यांत अनावश्यक बांधकामांना स्थगिती

जिल्हा वार्षिक योजनेतील निधी पाणीपुरवठा, जलस्रोत बळकटीकरण आणि पशुधनासाठी वळविणार

मुंबई : राज्यातील ३१० दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये निर्माण झालेल्या टंचाईसदृश परिस्थितीवर मात करण्यासाठी राज्य सरकारने जिल्हा वार्षिक योजनेतील निधीच्या वापराबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. पिण्याचे पाणी, पशुधनासाठी पाणी व चारा, जलस्रोतांचे बळकटीकरण आणि अत्यावश्यक स्वच्छतेच्या कामांना प्राधान्य देण्याचे निर्देश नियोजन विभागाने दिले आहेत. त्याचवेळी पाण्याचा मोठ्या प्रमाणावर वापर होणारी आणि टंचाई निवारणासाठी अत्यावश्यक नसलेली नवीन बांधकामे दुष्काळाची घोषणा लागू असेपर्यंत तात्पुरती स्थगित करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. त्यानुसार उद्याने,



सुशोभीकरण, नवीन प्रशासकीय इमारती, सिमेंट रस्ते आणि गटारांच्या कामांचाही आढावा घेतला जाणार आहे. गुरुवारी यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला.

या निर्णयानुसार, टंचाईग्रस्त गावांपर्यंत उपलब्ध जलस्रोतांमधील पाणी पोहोचविण्यासाठी अपूर्ण जलवाहिन्या, पंप, विद्युत जोडण्या, साठवण टाक्या आणि वितरण यंत्रणा पूर्ण करता येणार आहेत. दोष दायित्व कालावधी संपलेल्या पाणीपुरवठा योजनांमधील नादुरुस्त घटकांची दुरुस्ती, पाण्याची गळती रोखणे आणि उपलब्ध जलस्रोतांची टंचाईग्रस्त भागांशी जोडणी करण्यावर भर दिला जाणार आहे. कमी निधीअभावी अपूर्ण राहिलेली आणि अल्पावधीत पूर्ण होऊ शकणारी कामेही प्राधान्याने हाती घेता येतील. दुष्काळग्रस्त ३०४ तालुक्यांतील जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

पिण्याच्या पाण्याचे विद्यमान स्रोत बळकट करणे, त्यांचा सुरक्षित आणि कार्यक्षम वापर करणे, जलसंधारण व सिंचनाच्या माध्यमातून टंचाई निवारणाला मदत करणारी कामे पूर्ण करणे, तसेच नवीन जलस्रोत निर्माण करून पाण्याची साठवण क्षमता वाढविण्यालाही प्राधान्य दिले जाणार आहे. पशुधनासाठी पाणी आणि चारा उपलब्ध करून देण्याच्या उपाययोजना, सार्वजनिक आरोग्य, अत्यावश्यक स्वच्छता आणि उपजीविकेशी संबंधित कामांचाही यात समावेश आहे. नगरपालिका व नगरपंचायत क्षेत्रांमध्ये ३१ मार्च २०२७ पूर्वी पूर्ण होऊ शकणारे जलशुद्धीकरण प्रकल्प (डब्ल्यूटीपी), सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी), सांडपाण्याचा पुनर्वापर, सौर ऊर्जा प्रकल्प, जलप्रदूषण प्रतिबंधक आणि घनकचरा व्यवस्थापनाची अत्यावश्यक कामेही करता येणार आहेत.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड

सोलापूर : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पंढरपूर दौऱ्यादरम्यान त्यांच्या हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याची घटना समोर आली आहे. कार्तिकी यात्रेची पाहणी करून पुढील प्रवासासाठी निघण्याच्या तयारीत असताना हेलिकॉप्टरमध्ये बिघाड आढळला. त्यामुळे वैमानिकाने खबरदारी घेत उड्डाण रद्द केले. सुदैवाने या घटनेत कोणतीही दुर्घटना घडली नाही. त्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे रस्तेमार्गे पुण्याच्या दिशेने रवाना झाले.



मिळालेल्या माहितीनुसार, कार्तिकी यात्रेची पाहणी केल्यानंतर एकनाथ शिंदे हेलिकॉप्टरने पुढील प्रवास करणार होते. मात्र, उड्डाणापूर्वीच वैमानिकाच्या लक्षात हेलिकॉप्टरमधील तांत्रिक बिघाड आला. प्राथमिक माहितीनुसार, हेलिकॉप्टरच्या बॅटरीमध्ये समस्या निर्माण झाली होती. त्यामुळे कोणताही धोका न पत्करता वैमानिकाने उड्डाण थांबवण्याचा निर्णय घेतला.

शिंदे कारने पुण्याच्या दिशेने रवाना

हेलिकॉप्टरचे उड्डाण रद्द झाल्यानंतर सुरक्षा यंत्रणांनी पर्यायी प्रवासाची व्यवस्था केली. जिल्हाधिकाऱ्यांच्या विनंतीनंतर एकनाथ शिंदे रस्तेमार्गे पुण्याकडे रवाना झाल्याची माहिती शिवसेनेचे अमोल शिंदे आणि आमदार अभिजीत पाटील यांनी दिली.

राष्ट्रवादी काँग्रेस हिंगोलीचे माजी जिल्हाध्यक्ष बीडी बांगरानी मुंबईत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची घेतली भेट

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी जनतेला दिला सर्वतोपरी मदतीचा शब्द!

हिंगोली : जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिक मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जात आहेत. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी जिल्हाध्यक्ष बी. डी. बांगर यांनी मुंबई येथे राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार यांची भेट घेऊन हिंगोली जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीबाबत सविस्तर निवेदन सादर केले.

या भेटीदरम्यान हिंगोली जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत, शेतमजुरांना दिलासा तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी दूर करण्यासाठी शासनाने तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी आग्रही मागणी बी. डी. बांगर यांनी केली. दुष्काळामुळे शेतीचे झालेले नुकसान, शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती आणि ग्रामीण भागातील जनतेसमोर निर्माण झालेल्या समस्यांबाबत त्यांनी उपमुख्यमंत्र्यांशी सविस्तर चर्चा केली.

हिंगोली जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त जनतेला शासनाच्या माध्यमातून सर्वतोपरी



मदत करण्याबाबत सकारात्मक आश्वासन दिल्याची माहिती बी. डी. बांगर यांनी दिली.

दुष्काळाच्या कठीण काळात शेतकरी बांधवांना आधार देणे ही आपली सामाजिक आणि राजकीय जबाबदारी आहे. हिंगोली जिल्ह्यातील शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचेही बी. डी. बांगर यांनी स्पष्ट केले.

बालकामगारांना कामावर ठेवल्यास ५० हजार रूपयांपर्यंत दंड व कारावास

छत्रपती संभाजीनगर, दि. १९ (जिमाका)- बाल व किशोरवयीन कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, १९८६ मधील तरतुदीनुसार १४ वर्षांखालील बालकांना कोणत्याही कामावर नियुक्त करणे तसेच १४ ते १८ वयोगटातील किशोरवयीन मुलांना प्रतिबंधित उद्योग व प्रक्रियांमध्ये कामावर ठेवणे हा कायद्याने दंडनीय गुन्हा आहे. असे कृत्य करणाऱ्या संबंधित मालकांना २० हजार ते ५० हजार रुपयांपर्यंत दंड तसेच सहा महिने ते दोन वर्षांपर्यंत कारावासाची शिक्षा होऊ शकते,असे कामगार उपआयुक्त नितीन पाटणकर यांनी कळविले आहे. तरी जिल्ह्यातील सर्व आस्थापना, दुकाने, कारखाने, हॉटेल्स, गॅरेज तसेच अन्य व्यावसायिक संस्थांच्या मालकांनी बालकामगारांना कामावर ठेवू नये. तसेच १४ ते १८ वयोगटातील किशोरवयीन मुला- मुलींना कायद्याने प्रतिबंधित केलेल्या उद्योग व व्यवसायांमध्ये कामावर ठेवू नये, असे आवाहन कामगार उपआयुक्त नितीन पाटणकर यांनी केले आहे. बालकामगार प्रथेचे उच्चाटन करण्यासाठी सर्व आस्थापनांनी कायद्यातील तरतुदींचे काटेकोर पालन करावे,असे आवाहन त्यांनी केले आहे.





दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकीय

वंदे भारत स्लीपर ट्रेनमध्ये आता मराठी जेवणाचा दरवळ

भारतीय रेल्वेच्या आधुनिकतेचा चेहरामोहरा असलेल्या 'वंदे भारत' गाड्यांनी प्रवाशांना वेगवान आणि आरामदायी प्रवासाचा नवा अनुभव दिला आहे. १ नोव्हेंबरपासून सुरू झालेल्या अत्यंत प्रतिष्ठित मुंबई-बंगळुरू वंदे भारत स्लीपर ट्रेनला प्रवाशांचा उत्तम प्रतिसाद मिळत असतानाच, आता 'इंडियन रेल्वे केटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशन'ने (IRCTC) घेतलेला एक निर्णय प्रवाशांच्या जिव्हाळ्याचा आणि कौतुकाचा विषय ठरला आहे. या ट्रेनच्या मेन्यूमध्ये लवकरच 'पुरणपोळी' आणि 'झुणका-भाकर' यांसारख्या अस्सल पारंपरिक महाराष्ट्रीयन पदार्थांचा समावेश केला जाणार आहे. प्रवासात केवळ पोटाची भूक भागवणे महत्त्वाचे नसते, तर प्रवाशांना त्यांच्या मातीतील चवीचा आणि संस्कृतीचा अनुभव देणे, हे आधुनिक आदरातिथ्याचे खरे लक्षण आहे. ही गाडी बंगळुरूहून सुटत असल्याने तिच्या सध्याच्या मेन्यूमध्ये उपमा, मेदू वडा आणि इडली-सांबार यांसारख्या दक्षिण भारतीय पदार्थांचे वर्चस्व होते. त्यामुळे मुंबई आणि महाराष्ट्रातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी स्थानिक पदार्थांचे पर्याय मर्यादित होते. 'फेडरेशन ऑफ सबर्बन रेल्वे पॅसेंजर्स असोसिएशन'चे अध्यक्ष नंदकुमार देशमुख यांनी केलेली मागणी आणि प्रवाशांची भावना लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने घेतलेली ही सकारात्मक भूमिका अत्यंत स्वागतार्ह आहे. आधीच निश्चित झालेल्या पोह्यांसोबत आता गोड पुरणपोळी आणि खमंग झुणका-भाकरीचा आस्वाद प्रवाशांना घेता येणार असल्याने लांब पल्ल्याचा हा रेल्वे प्रवास अधिक सुखकर आणि संस्मरणीय होणार आहे. कोणत्याही रेल्वे प्रवासात खाद्यपदार्थांची चव जितकी महत्त्वाची असते, तितकीच त्यांची स्वच्छता, ताजेपणा आणि दर्जा राखणे हे मोठे आव्हान असते. आयआरसीटीसीने या बाबीचे गांभीर्य ओळखून उच्च दर्जाच्या 'क्लाउड किचन' आणि नामांकित रेस्टॉरंट्सचा शोध सुरू केला आहे. पदार्थांचे योग्य पॅकेजिंग करणे, प्रवासादरम्यान त्यांचे तापमान टिकवून ठेवणे आणि मोठ्या प्रमाणावर अखंड पुरवठा करणे, या तांत्रिक बाबींचा आढावा घेऊन रेल्वे बोर्डाकडे अंतिम प्रस्ताव पाठवला जाणार आहे. देशातील दोन प्रमुख महानगरांना जोडणाऱ्या या हाय-टेक ट्रेनमध्ये स्थानिक खाद्यसंस्कृतीचा झालेला हा संगम, भारतीय रेल्वेच्या प्रवाशीकेंद्रित धोरणाचे एक उत्तम उदाहरण ठरेल, यात शंका नाही.

नांदूर मधमेश्वर कालव्यातून पाण्याचे आवर्तन ; लाभक्षेत्रात प्रतिबंधात्मक आदेश

छत्रपती संभाजीनगर, दि. 19 (जिमाका) – नांदूर मधमेश्वर कालवा प्रकल्पाच्या मुख्य कालवा, शाखा कालवे, वितरिका व लघुवितरिकांद्वारे शेतकऱ्यांना रब्बी हंगाम 2026-27 साठी दि. 20 नोव्हेंबरपासून नियोजित पाणीपाळीनुसार सिंचनासाठी आवर्तन सोडण्यात येणार आहे. या कालवा प्रणालीच्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील लाभक्षेत्रात दि.11 जानेवारी 2027 पर्यंत भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, 2023 च्या कलम 163 (1) अन्वये अपर जिल्हादंडाधिकारी जनार्दन विधाते यांनी प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. त्यानुसार सिंचन आवर्तनादरम्यान कालव्यांमधून होणारा अनधिकृत पाणी उपसा, कालव्यावरील काटनियामक (CR) व इतर नियंत्रण संरचनांमध्ये हस्तक्षेप, कालव्यांचे दरवाजे परस्पर उघडणे अथवा बंद करणे, कालव्यात अडथळे निर्माण करणे, कालवा व संबंधित बांधकामांचे नुकसान करणे तसेच पाणीवाटपाच्या शासकीय कामकाजात अडथळा निर्माण करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. लाभक्षेत्रातील सर्व शेतकऱ्यांना मंजूर पाणीपाळीनुसार न्याय्य व समन्यायी पद्धतीने पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी हे आदेश लागू करण्यात आले आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध संबंधित विभागाने गुन्हे दाखल करावेत, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

महात्मा जोतिराव फुले: तर्कतीर्थांच्या दृष्टिकोनातून

महात्मा जोतिराव फुले हे केवळ समाजसुधारक नव्हते, तर भारतीय समाजव्यवस्थेला मूलभूत प्रश्न विचारणारे क्रांतिकारक विचारवंत होते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या 'ज्योति-निबंध' या ग्रंथातून फुल्यांच्या सामाजिक कार्याचे आणि विचारांचे चिकित्सक मूल्यमापन केले आहे.

फुल्यांच्या कार्याचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी समाजातील अनिष्ट प्रथा बदलण्याऐवजी त्या प्रथांना जन्म देणारी विषमतेची व्यवस्थाच बदलण्याचा प्रयत्न केला.

एकोणिसाव्या शतकात भारतीय समाज जातिभेद, अस्पृश्यता, स्त्रीदास्य आणि अज्ञानाने ग्रस्त होता. अशा परिस्थितीत फुल्यांनी शिक्षण, समता आणि विवेक यांच्या आधारे सामाजिक परिवर्तनाची चळवळ उभारली. महात्मा फुले यांच्याबाबत अनेक लेखक, संशोधकांनी भरपूर संशोधन करुन मोठ्या प्रमाणावर साहित्यनिर्मिती केली. प्रत्येकाने आपापल्या परिने महात्मा फुल्यांच्या कार्याचे विश्लेषण , समिक्षण केले. मात्र तर्कतीर्थांनी केलेले विश्लेषण हे अत्याधिक वस्तुनिष्ठ मानावयास हवे. त्याला कारण तर्कतीर्थांची वैचारीक बैठक आणि ज्ञान परंपरेशी जोडलेली नाळ हे होय.

तर्कतीर्थांची ज्ञान परंपरा

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे एक महान विद्वान होते. प्राज्ञ पाठशाळा वाईयेथे मोठे कार्य त्यांनी उभारले. ज्ञान आणि संशोधनाचे मोठे कार्य त्यांनी निर्माण केले. जगातील सर्व विद्याशाखांमधील ज्ञान हे मराठी भाषेत उपलब्ध व्हावे,अशीही त्यांची भूमिका होती. त्यासाठीच महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी त्यांना मराठी विश्वकोश मंडळाचे पहिले अध्यक्ष केले. विश्वकोशाच्या माध्यमातून सर्व विद्याशाखांचे ज्ञान मराठी भाषेतील नोंदींमधून उपलब्ध आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे स्वतः पुरोगामी विचारवंत होते. त्यामुळे त्यांनी धर्मशास्त्र, संस्कृतिविषयक विविध विषयांवर विस्तृत ग्रंथसंपदा निर्माण केली. प्रत्येक कार्यामागे त्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन होता.

महात्मा फुले यांच्या कार्याबद्दल तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी जोति निबंध 1947 मध्ये लिहिला. जोतिराव पुले भारतातील सामाजिक गुलामगिरीच्या विरुद्ध बंड पुकारणारा पहिला पुरुष असे या निबंधाचे नाव होते. तर्कतीर्थ स्वतःला बुद्धिवादी परंपरेचा अनुयायी म्हणत. ते म्हणत, 'राममोहन रॉय, न्यायमूर्ती रानडे, जोतिबा फुले, लोकहितवादी, डॉ. भांडारकर, प्रिन्सिपल आगरकर इ. सुधारकांनी निर्मिलेल्या बुद्धिवादी परंपरेचा मी अनुयायी आहे, आणि स्वतःस सत्यशोधकांचा चहाता समजतो'.

शिक्षणातून सामाजिक मुक्ती

महात्मा फुल्यांनी शिक्षणाला सामाजिक क्रांतीचे प्रमुख साधन मानले.



ज्ञानावर कोणत्याही एका वर्गाची मक्तेदारी असू नये, ही त्यांची भूमिका होती. स्त्रिया आणि बहुजन समाजाला शिक्षण मिळाल्याशिवाय त्यांची गुलामगिरी संपणार नाही, याची त्यांना जाणीव होती. त्यांच्या दृष्टीने शिक्षण म्हणजे केवळ साक्षरता नव्हे, तर अन्याय ओळखण्याची आणि त्याविरुद्ध उभे राहण्याची क्षमता होय.

इतिहासाकडे पाहण्याची नवी दृष्टी

फुल्यांनी इतिहासाकडे राजे-महाराजांच्या दृष्टिकोनातून नव्हे, तर शोषित आणि वंचित समाजाच्या दृष्टिकोनातून पाहिले.

त्यांनी भारतीय इतिहासाची स्वतंत्र मांडणी केली. मात्र तर्कतीर्थांनी फुल्यांच्या या इतिहासदृष्टीचे महत्त्व मान्य करतानाच त्यांच्या काही ऐतिहासिक निष्कर्षांची चिकित्साही केली आहे.

फुल्यांचे मोठेपण त्यांच्या प्रत्येक ऐतिहासिक निष्कर्षात नसून, इतिहासाकडे पाहण्याची नवी सामाजिक दृष्टी त्यांनी दिली, यात आहे.

सत्यशोधक समाज आणि समतेचा विचार

1873 मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना करून फुल्यांनी आपल्या विचारांना संघटित चळवळीचे स्वरूप दिले. जन्माधिष्ठित श्रेष्ठत्व, धार्मिक कर्मकांड आणि सामाजिक विषमतेला त्यांनी आव्हान दिले. प्रत्येक माणसाला समान प्रतिष्ठा मिळाली पाहिजे, हा त्यांच्या विचारांचा गाभा होता.

फुल्यांच्या सार्वजनिक सत्यधर्मामध्ये सत्य, नीती, विवेक आणि मानवता या मूल्यांना महत्त्व होते. धर्म हा माणसाला जोडणारा असावा, त्याच्यात भेद निर्माण करणारा नसावा, अशी त्यांची भूमिका होती.

तर्कतीर्थांचे चिकित्सक मूल्यमापन

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी फुल्यांचा केवळ गौरव केलेला नाही. त्यांच्या विचारांचे ऐतिहासिक संदर्भ लक्षात घेऊन चिकित्सक विश्लेषण केले आहे.

फुल्यांच्या काही ऐतिहासिक मांडण्यांशी मतभेद असले तरी त्यांनी बहुजन समाजात निर्माण केलेली जागृती, शिक्षणाचा प्रसार आणि सामाजिक समतेचा आग्रह यांचे ऐतिहासिक महत्त्व तर्कतीर्थ अधोरेखित करतात.

आजच्या काळातील महत्त्व

आज शिक्षणाचा प्रसार झाला, कायद्याने समानता मिळाली; तरी जातीय विषमता, अंधश्रद्धा आणि सामाजिक भेदभाव पूर्णतः संपलेले नाहीत.

म्हणूनच महात्मा फुल्यांचे विचार आजही तितकेच महत्त्वाचे आहेत.

फुल्यांनी आपल्याला केवळ अन्यायाविरुद्ध संघर्ष करायला शिकविले नाही, तर अन्याय निर्माण करणाऱ्या व्यवस्थेची चिकित्सा करायलाही शिकविले. महात्मा फुले यांनी भारतीय समाजाला तीन मूलभूत गोष्टी दिल्या—शिक्षणातून जागृती, विवेकातून सत्यशोधन आणि समतेतून मानवी प्रतिष्ठा. तर्कतीर्थांच्या लेखनातून स्पष्ट होते की, फुल्यांची सामाजिक क्रांती ही केवळ एका समाजघटकाच्या मुक्तीची चळवळ नव्हती, तर संपूर्ण समाजाला अधिक न्याय्य आणि मानवतावादी बनविण्याचा प्रयत्न होता.

महात्मा फुल्यांचे खरे स्मरण त्यांच्या प्रतिमेच्या पूजनात नाही, तर त्यांनी मांडलेल्या समता, सत्य आणि विवेक या मूल्यांच्या आचरणात आहे.

-डॉ. मिलिंद मधुकर दुसाने
जिल्हा माहिती अधिकारी, छत्रपती संभाजीनगर

संदर्भः
1.जोतिचरित्र, लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रथम आवृत्ती, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडीया.
2.ज्योति निबंध-तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी., 1947, प्राज्ञ पाठशाळा, वाई.

स्वदेशी आणि आत्मनिर्भरतेचा विचार घराघरांत न्या; 'फिक्की'च्या संमेलनात पंतप्रधान मोदींचे उद्योजकांना स्पष्ट आवाहन

नवी दिल्ली : महात्मा गांधी यांनी १९३० मध्ये देशाला स्वदेशी वस्तूंचा वापर आणि आत्मनिर्भरतेचा जो मूलमंत्र दिला होता, तोच संदेश आज शंभर वर्षांनंतरही पुढे नेण्याची गरज असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी स्पष्ट केले. नवी दिल्लीतील 'भारत मंडपम' येथे आयोजित 'फिक्की'च्या (FICCI) वार्षिक सर्वसाधारण सभेत आणि संमेलनात ते बोलत होते. यावेळी त्यांनी 'आत्मनिर्भर भारत' ही संकल्पना केवळ भाषणापुरती न ठेवता ती देशातील प्रत्येक घरापर्यंत पोहोचवण्याचे आवाहन उद्योग जगताला केले.

उद्योगपतींशी थेट संवाद साधताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, "विचार करा, आज शंभर वर्षे उलटून गेली तरी गांधीजींनी १९३० मध्ये दिलेला संदेश मला पुन्हा सांगावा लागत आहे. हे आपल्या यशाचे लक्षण मानायचे की अपयशाचे? माझे ऐकू नका, पण निदान गांधीजींचे तरी ऐकायला हवे होते! त्यांनीही स्वदेशी आणि आत्मनिर्भर भारताचीच भूमिका मांडली होती. आता फिक्कीलाही शंभर वर्षे पूर्ण होत आहेत, तरीही आपण तिथेच आहोत. माझा हा संदेश प्रत्येक घराघरांत पोहोचावा."

पूर्वीच्या सरकारांचा संदर्भ देत पंतप्रधान म्हणाले की, मागील सरकारांच्या काळात उद्योग जगताला आलेले अनुभव इतके कडू होते की, त्याचा परिणाम आजच्या सरकारसोबतच्या संबंधांवरही दिसून येतो. "जुन्या सरकारांचे कटू अनुभव आज मला सहन करावे लागत आहेत. मात्र, हे पूर्वीसारखे सरकार नसून मित्रांचे सरकार आहे. या सरकारला मैत्री कशी जपायची हे ठाऊक आहे आणि तुम्ही सर्व माझे खरे मित्र आहात. त्यामुळे कोणताही संकोच किंवा भीती न ठेवता, अजून काय सुधारणा करायला हव्यात याबद्दल मला थेट आणि मोकळेपणाने पत्र लिहा," असे आश्वासन मोदींनी दिले.

औषध निर्मिती (फार्मा) क्षेत्रातील उद्योजकांना मार्गदर्शन करताना पंतप्रधानांनी परदेशातून आयात होणाऱ्या कच्च्या मालावरील (APIs आणि बल्क ड्रग्स) अवलंबित्व कमी करण्यावर भर दिला. भारत 'जगाची फार्मसी' म्हणून ओळखला जात असला, तरी आपण दरवर्षी अब्जावधी डॉलर्सचा कच्चा माल बाहेरून आयात करतो, याकडे त्यांनी लक्ष वेधले. "अनेक क्षेत्रांमध्ये आपण आजही आयातीवर अवलंबून आहोत. आपल्या फार्मा उद्योगाने कोणते घटक देशातच तयार करणे शक्य आहे, याचा अभ्यास करावा. जागतिक बाजारपेठेत टिकून राहण्यासाठी नवीन तंत्रज्ञान आणि मोठ्या उत्पादन प्रकल्पांमध्ये कुठे गुंतवणूक करता येईल, याचा विचार करावा," असे त्यांनी सांगितले. कृषी क्षेत्राबाबत बोलताना मोदींनी उद्योगांना शेतीत अधिक गुंतवणूक करण्याचा आणि परदेशातील मागणीनुसार उत्पादने तयार करण्याचा सल्ला दिला. परदेशातील विशिष्ट बाजारपेठा लक्षात घेऊन शेतमाल खरेदीची मजबूत व विश्वासार्ह साखळी उभारावी, जेणेकरून भारतीय उत्पादने हीच जगभरात भारताची ओळख बनतील, असे त्यांनी स्पष्ट केले. भारताच्या आर्थिक प्रगतीचा उल्लेख करत पंतप्रधान म्हणाले की, आज भारत जगातील सर्वात वेगाने वाढणारी मोठी अर्थव्यवस्था असून विकास दर सुमारे ७ टक्क्यांच्या आसपास राहण्याचा अंदाज आहे. ऑक्टोबर महिन्यात भारताची वस्तू निर्यात जवळपास ५० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचली असून, हा आतापर्यंतचा एका महिन्यातील सर्वोत्तम विक्रम आहे. भारताच्या या भक्कम आर्थिक कामगिरीमुळेच 'मूडीज', 'एस अँड पी', 'फिच', जागतिक बँक आणि आशियाई विकास बँक यांसारख्या आंतरराष्ट्रीय संस्था भारताच्या विकास दराचा अंदाज वाढवून सांगत असल्याचे त्यांनी नमूद केले.

कर सुधारणा आणि उद्योजकांच्या सन्मानाचा मुद्दा मांडताना पंतप्रधान म्हणाले की, कोणताही देश शेतकरी, छोटे उद्योजक, संपत्ती निर्माण करणारे आणि करदाते यांना सतत दोष देऊन किंवा हिणवून पुढे जात नाही, तर त्यांचा सन्मान करूनच प्रगती करतो. २००१-०२ मध्ये गुजरातचे मुख्यमंत्री झाल्यानंतर आयकर विभागाच्या एका कार्यक्रमात प्रत्येकाकडे 'चोर' म्हणून पाहण्याची वृत्ती कधी बदलणार, असा प्रश्न आपण विचारला होता, ही आठवणही त्यांनी यावेळी जागवली.

केंद्र सरकारच्या करविषयक निर्णयांची माहिती देताना मोदी म्हणाले की, २०१४ मध्ये कॉर्पोरेट कराचा मूळ दर ३० टक्के होता, तो कमी करून २२ टक्के करण्यात आला. सध्या १२ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त केले आहे. या सवलतींचा लाभ घेत उद्योजकांनी कर्मचाऱ्यांचे पगार वाढवले का किंवा नवीन रोजगार निर्माण केले का, असा सवालही त्यांनी केला. पूर्वी कर परतावा (रिफंड) मिळायला आठ महिने लागत असत; मात्र आता प्रक्रिया सोपी केल्यामुळे केवळ एका आठवड्यात परताव्याची रक्कम मिळते, असे त्यांनी सांगितले.

देश सध्या 'रिफॉर्म एक्सप्रेस'वर (सुधारणांची वेगवान गाडी) स्वार होऊन पुढे जात असून सरकार उद्योगांसोबत पूर्ण ताकदीने उभे राहण्यास तयार आहे, अशी ग्वाही पंतप्रधानांनी दिली. त्याचबरोबर भारतीय ग्राहकांना गृहीत धरू नका, असा सज्जड इशाराही त्यांनी व्यावसायिकांना दिला. "१४० कोटी भारतीयांची बाजारपेठ आपल्या हातात आहे, इथे कोणताही माल खपेल, असा समज ठेवू नका. आजही अनेक विक्रेते ग्राहकांना चांगली वस्तू दाखवताना 'ही एक्सपोर्ट क्वालिटीची आहे' असे सांगतात. मग आपल्या देशवासियांना दर्जेदार वस्तू मिळण्याचा अधिकार नाही का? ही मानसिकता बदललीच पाहिजे; माझ्या देशवासियांना सर्वोत्तम दर्जाच्याच वस्तू मिळायला हव्यात," असे मोदींनी ठामपणे सांगितले. जगातील अनेक मोठ्या अर्थव्यवस्थांसोबत भारताने 'मुक्त व्यापार करार' (FTA) केल्यामुळे उद्योजकांसाठी नव्या संधीची दारे खुली झाली आहेत. सरकारने केलेल्या या प्रयत्नांचा फायदा घेण्यासाठी उद्योजकांनी ठोस नियोजन करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

'भारत २०४७' या मुख्य संकल्पनेवर आधारित 'फिक्की'च्या या संमेलनात देश-विदेशातील २,५०० हून अधिक प्रतिनिधी, उद्योजक, मुख्य कार्यकारी अधिकारी, राजदूत आणि धोरणकर्ते सहभागी झाले होते. या परिषदेत भारताची आर्थिक वाढ, जागतिक स्पर्धात्मकता, सुधारणांचा पुढील टप्पा, उत्पादन क्षेत्र आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) संधींवर सविस्तर चर्चा झाली. १९२७ मध्ये स्थापन झालेली 'फिक्की' ७ एप्रिल २०२७ रोजी आपल्या स्थापनेची १०० वर्षे पूर्ण करत आहे. देशभरातील अडीच लाखांहून अधिक कंपन्या आणि ३०० हून अधिक प्रादेशिक व राज्यस्तरीय उद्योग संघटनांचे प्रतिनिधित्व ही संस्था करते.

कोकण – निसर्गसौंदर्य, संस्कृती आणि आपली जबाबदारी !

कोकणचे जतन, संबर्धन आणि शाश्वत विकासासाठी आता तरी जागे व्हा...!

महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यांवर वसलेला कोकण हा निसर्गाचा खराखुरा खजिना आहे. सह्याद्रीच्या डोंगररांगांपासून अरबी समुद्राच्या किनाऱ्यापर्यंत पसरलेला हा प्रदेश म्हणजे हिरवळ, पावसाळी वातावरण, समुद्रकिनारा आणि साध्या, मनमिळाऊ माणसांची भूमी. नारळ, सुपारी, आंबा, फणस, काजू यांसारख्या फळांनी समृद्ध असलेला कोकण हा केवळ पर्यटनस्थळ नाही, तर महाराष्ट्राच्या आर्थिक आणि सांस्कृतिक जीवनाचा महत्त्वाचा भाग आहे.



कोकणातील पर्यटन – बाढती संधी

गणपतीपुळेचे किनारे, देवगदची हापूस आंब्याची बाग, सिंधुदुर्गचा समुद्रकिनारा, अलिबागचा गड, दापोलीची निसर्गरम्य ठिकाणे – कोकणात पर्यटनाच्या असंख्य संधी आहेत. योग्य नियोजन आणि पायाभूत सुविधांमुळे कोकण पर्यटन वाढून रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होऊ शकतात.



सिंधुदुर्ग किल्ला

कोकणची ओळख – निसर्गाचा वैभवशाली ठेवा

कोकण म्हणजे हिरव्या डोंगररांगा, धबधबे, खाडया, समुद्रकिनारे आणि आनंद देणारे हवामान. येथे पावसाळा हा केवळ ऋतू नसून जीवनाचा उत्सव असतो. आंबा, काजू, नारळ यांसारख्या फळांमुळे कोकण शेतीदृष्टिया सुद्धा विशेष आहे.



कोकणातील पारंपरिक घर

कोकणची संस्कृती – आपली जीवनशैली

कोकणची संस्कृती ही साधेपणा, माणुसकी आणि परंपरेची श्रीमंती जपणारी आहे. कोकणातले गणेशोत्सव, नारळी पौर्णिमा, होळी, दिवाळी यांसारखे सण उत्साहात साजरे केले जातात. कोकणातील लोकरुला, लोकसंगीत, कोळी संस्कृती ही येथील वैशिष्ट्ये आहेत.



कोकणचा स्वाष्टिट आहार

पर्यावरणाचा समतोल राखणे गरजेचे

कोकणची खरी ओळख म्हणजे येथील निसर्गसंपदा. पण अतिरिक्ति विकास, जंगलतोड, प्लास्टिकचा वापर आणि अनियंत्रित पर्यटनांमुळे या परिसरचे पर्यावरण धोकयात आले आहे. म्हणूनच, कोकणचे जतन करणे ही काळाची गरज आहे. प्रत्येकांने झाडे लावणे, समुद्र व नद्यांचे प्रदूषण रोखणे आणि पर्यावरणपूरक जीवनशैली स्बीकारणे आवश्यक आहे.

शाश्वत विकासाची वाट

कोकणच्या विकासासाठी सरकारने रस्ते, आरोग्य, शिक्षण, आणि पर्यटनासंबंधी सुविधा वाढवाव्यात, यासोबतच स्थानिकांच्या हक्कांचे संरक्षण करावे. विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखतच कोकणचा सर्वांगीण विकास शक्य आहे.



कोकण रेल्वे – विकासाची गती

समारोप

कोकण ही केबळ भूमी नाही,
तर आपल्या संस्कृतीची, भावनांची
आणि महाराष्ट्राच्या अस्मितेची शान आहे.
चला, कोकणचे जतन करूया...
कारण, कोकण वाचला तर महाराष्ट्र वाचेल !

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

दुष्काळावर मात करण्यासाठी जलसंधारणाची लोकचळवळ उभारा : जयकुमार गोरे

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानात हिंगोलीच्या दाटेगावला एक कोटींचा प्रथम पुरस्कार

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : विकसित महाराष्ट्राचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ग्रामीण भागातील गावे समृद्ध होणे आवश्यक आहे. सध्याच्या दुष्काळी परिस्थितीकडे जलसंधारणाची व्यापक कामे करण्याची संधी म्हणून पाहावे. प्रत्येक गावाने लोकसहभागातून जलसंधारणाची कामे हाती घेऊन दुष्काळावर मात करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी गुरुवारी केले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान २०२५-२६ अंतर्गत छत्रपती संभाजीनगर विभागातील उत्कृष्ट ग्रामपंचायतींचा विभागस्तरीय व जिल्हास्तरीय पुरस्कार वितरण सोहळा, तसेच अभियानाच्या २०२६-२७ या वर्षातील अंमलबजावणीसंदर्भातील विभागीय कार्यशाळा आणि 'दुष्काळावर मात व समृद्ध गावाचा संकल्प' या विषयावरील परिसंवादाचे आयोजन केंब्रिज स्कूल चौक मैदानावर करण्यात आले होते. यावेळी मंत्री गोरे बोलत होते.

अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात जलसंधारणाच्या कामांना सर्वाधिक गुण देण्यात आले आहेत. जलयुक्त शिवार अभियान आणि पाणी फाउंडेशनच्या धर्तीवर गावागावांत लोकसहभागातून जलसंधारणाची कामे उभी राहावीत. ग्रामपंचायतींनी पुरस्कार मिळविण्यापेक्षा गाव समृद्ध करण्याला प्राधान्य द्यावे. अभियानातील कामांचे निष्पक्ष आणि पारदर्शक मूल्यमापन करण्यात आले असून, प्रत्येक गावातील कामांची तीन वेळा तपासणी करण्यात आल्याचेही गोरे यांनी सांगितले.

अभियानाच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील ५ हजार ७४६ ग्रामपंचायती सहभागी झाल्या. या माध्यमातून सुमारे ६९ लाख आयुष्मान भारत कार्डे, १ लाख १० हजार दिव्यांगांना ओळखपत्रे देण्यात आली. ४ हजार १८ ग्रामपंचायतींच्या वेबसाइट तयार करण्यात आल्या, तर ४ हजार ४७ ग्रामपंचायतींमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली. तसेच ३ लाख ५९ हजार घरकुले पूर्ण झाली असून, घरकुलासाठी जागा नसलेल्या ५४ हजार ४७७ भूमिहीन लाभार्थ्यांना जमीन उपलब्ध करून देण्यात आली. गावांतर्गत २ हजार ७०६ किलोमीटर आणि पाणंद रस्त्यांची २ हजार ७३० किलोमीटर कामे पूर्ण करण्यात आली.

याशिवाय ५ हजार ११८ स्मशानभूमींमध्ये सुविधा, २ हजार ३७८ गावांत व्यायामशाळा आणि ४ हजार २८२ गावांत वाचनालये उभारण्यात आली. शाळांमध्ये मुला-मुलींसाठी स्वतंत्र शौचालयांची सुविधा निर्माण करण्यात आली. ग्रामपंचायतींच्या माध्यमातून ६७ लाख वृक्षांची लागवड करण्यात आली असून, ८१५ कोटी रुपयांची घरपट्टी आणि २४१ कोटी रुपयांची पाणीपट्टी वसूल झाली, अशी माहिती त्यांनी दिली.

यावेळी इतर मागासवर्ग बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी मराठवाड्यातील दुष्काळावर मात करण्यासाठी प्रत्येक गावाने पाण्याचा थेंब न् थेंब साठविण्याचा संकल्प करावा, असे आवाहन केले. जलतारा शोषखड्डे, तलाव व विहिरींमधील गाळ काढणे, बोअरवेल पुनर्भरण आणि सौरऊर्जेचा वापर वाढविण्यावर त्यांनी भर दिला. राज्यमंत्री योगेश कदम यांनी लोकसहभागातून दापोली तालुक्यात उभारण्यात आलेल्या १ हजार १०० वनराई बंधाऱ्यांचे उदाहरण दिले. राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी महिला बचत गट, तरुणाई आणि ग्रामपंचायतींच्या सहभागातून दुष्काळमुक्तीची लोकचळवळ उभी करण्याचे आवाहन केले.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमाचे स्वरूप स्पष्ट केले. ग्रामविकास विभागाचे सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यातील १०० टक्के ग्रामपंचायतींचा सहभाग बंधनकारक असल्याचे सांगितले. प्रत्येक ग्रामपंचायतीने १०० पैकी किमान ७० गुण मिळविणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

दाटेगावला एक कोटींचा पुरस्कार

विभागस्तरीय अत्युत्कृष्ट ग्रामपंचायत पुरस्कारात हिंगोली जिल्ह्यातील दाटेगाव ग्रामपंचायतीने प्रथम क्रमांक मिळविला. या ग्रामपंचायतीला एक कोटी रुपयांचा पुरस्कार जाहीर झाला. लातूर जिल्ह्यातील आनंदवाडी (गौर) ग्रामपंचायतीने द्वितीय क्रमांक पटकावत ८० लाख रुपये, तर बीड जिल्ह्यातील वंजरवाडी ग्रामपंचायतीने तृतीय क्रमांक मिळवत ६० लाख रुपयांचे पारितोषिक मिळविले.

छत्रपती संभाजीनगर जिल्हास्तरीय पुरस्कारात लाडगाव-हिवरा ग्रामपंचायतीने प्रथम क्रमांक मिळवत ५० लाख रुपये, जरंडी ग्रामपंचायतीने द्वितीय क्रमांक मिळवत ३० लाख रुपये, तर पाटोदा ग्रामपंचायतीने तृतीय क्रमांक मिळवत २० लाख रुपयांचे पारितोषिक पटकाविले.

कार्यक्रमाला आमदार प्रशांत बंब, अनुराधा चव्हाण, रमेश बोरणारे, संजना जाधव, विलास भुमरे, नारायण कुचे, सुहास शिरसाट, राज्यस्तरीय अभ्यास समितीचे अध्यक्ष रितेश वानखडे, इंद्रीस मुलतानी, जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे, उपाध्यक्ष जितेंद्र जैस्वाल, मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांच्यासह विविध पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते. यावेळी पोपटराव पवार, डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी आणि डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांनी ग्रामविकास, अभियानाचे गुणांकन आणि जलतारा शोषखड्ड्यांबाबत मार्गदर्शन केले.

सिद्धार्थ जलतरण तलावाचे आजीव सभासदत्व आता 45,155 रुपयांत

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सिद्धार्थ जलतरण तलावाच्या २० वर्षांच्या आजीव सभासदत्व शुल्कात ११ हजार रुपयांची सवलत देण्यात आली आहे. त्यामुळे यापुढे आजीव सभासदत्वासाठी ५६ हजार १५५ रुपयांऐवजी ४५ हजार १५५ रुपये शुल्क आकारले जाणार आहे.

महानगरपालिकेच्या ४ नोव्हेंबर २०२६ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत यासंदर्भातील ठराव मंजूर करण्यात आला. त्यानुसार सभासदत्व शुल्क कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही विशेष सवलत २३ ते २७ नोव्हेंबर २०२६ या पाच दिवसांच्या कालावधीतच लागू राहणार आहे.

जलतरणाची आवड असलेल्या नागरिकांसाठी ही संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. इच्छुक नागरिकांनी विहित मुदतीत सिद्धार्थ जलतरण तलाव येथे आजीव सभासदत्वासाठी नोंदणी करून या सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाच्या माहिती व जनसंपर्क विभागातर्फे करण्यात आले आहे. २७ नोव्हेंबरनंतर ही सवलत लागू राहणार नसल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

चातुर्मास कलश ज्या घरात जातो, ते घर शुभमंगलमय होते! : आचार्य हेमसागर महाराज



छत्रपती संभाजीनगर : चातुर्मास कलश ज्या घरात जातो, त्या घरात सदैव शुभमंगलमय वातावरण राहते, असे प्रतिपादन आचार्य श्री १०८ हेमसागरजी महाराज यांनी केले. चातुर्मासाच्या चार महिन्यांत साधू-संतांच्या सान्निध्यात धार्मिक अनुष्ठान, मंत्रजप आणि विविध आध्यात्मिक उपक्रमांच्या माध्यमातून श्रद्धा, भक्ती व संस्कारांची वृद्धी होते. त्यामुळे प्रत्येकाने धार्मिक कार्यात सहभागी होऊन आपले जीवन सार्थक करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

आर्यनंदी कॉलनी, वेदांतनगर येथील श्री १००८ चंद्रप्रभ भगवान दिगंबर जैन मंदिरात आचार्य श्री १०८ हेमसागरजी महाराज यांच्या सान्निध्यात चातुर्मास समापन महोत्सव उत्साहात पार पडला. या सोहळ्याला सकल जैन समाजातील श्रावक-श्राविकांची मोठी उपस्थिती होती.

गुरु आमंत्रण आणि गुरुदेवांच्या मंगल आगमनाने सोहळ्याची सुरुवात झाली. त्यानंतर दीपप्रज्वलन, गुरु पूजन आणि प्रस्तावना करण्यात आली. यावेळी महाराजांनी आपल्या प्रवचनातून चातुर्मासाचे महत्त्व, साधूंचे संयमी जीवन, अहिंसा, धर्माचरण आणि आत्मसाधनेचे महत्त्व विशद केले. या सोहळ्यात पूनमचंदजी अग्रवाल (साहूजी) यांनी घेतलेल्या वर्षायोग मंगल कलशाची विधिवत स्थापना करण्यात आली. गुरुदेवांच्या मंगल आशीर्वचनांनी कार्यक्रमाची सांगता झाली. त्यानंतर सायंकाळी महाप्रसादीचे आयोजन करण्यात आले होते. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून गुरुदर्शन आणि धर्मलाभ घेतला.

परभणी करांनाना खुशखबर गुंठेवारी व नोटरी धारकांना घरपट्टी लागू होणार

परभणी**शहर मानावे पालखीच्या क्षेत्रातील विविध प्रभागातील मागील तीस वर्षापासून वास्तव्यात असलेल्या नागरिकांना त्यांच्या मालमत्तेच्या मालकी हक्क मिळवण्यासाठी मनपा सदस्य नवीन इनामदार यांनी पुढाकार घेतला होता त्यांच्या पाठपुरावाला यश मिळाले असून कबाला धारकाच्या मालमत्तेच्या निर्मितीकरण करून त्यांना कायदेशीर मालकी हक्क प्रदान करण्यात ठराव महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेमध्ये मंजूर करण्यात आला आहे याबाबत महापालिका प्रशासनाने तातडीने कार्यवाही करण्याचे आधी संकेत दिले आहेत परभणी शहरात मागील 30 वर्षापासून वास्तवात असलेले हजारो नागरिकांना या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळणार आहे नागरिकांना मालकी हक्क मिळणार असून मिळणार असून गुंठेवारी व नोटरी धारकांना याचा लाभ होणार आहे याबाबत ठराव घेण्यात आला आहे परभणी शहरातील नोटरी धारक व कबाले धारक घरांनाघरपट्टी लावण्याकरिता योग्य ती तपासणी करून घरपट्टीला नावे लावण्याची कार्यवाही प्रशासनाने करावी तसेच कबालीधारक व नोटरी धारक यांना रजिस्ट्रीची अट शिथिल करून प्रधानमंत्री आवास योजनेची लाभ देणे करता प्रशासनाकडे प्रस्ताव सादर करण्याचा सूचनाही देण्यात आल्या आहेत परभणी शहरातील काद्राबाद पाकीजा मोहल्लाईटलापूर मोहला कालाबावर शहागंज सिद्धार्थ नगर गुंडाळे भवन परिसर पाशाभाई यांच्या घरासमोरील भाग मुस्ताक मंजिल आधी ठिकाणच्या रहिवाशांना फायदा होणार असून सदर याविषयी मार्गी लावण्यात करिता गटनेता दिलीप ठाकूर यांनी अनुमोदन दिले या विषयाला मंजुरी दिल्याबद्दल नदीमइनामदार यांनी महापौर सय्यद इकबाल उपमहापौर गणेश देशमुख मनपा आयुक्त तसेच इतर सदस्यांचे आभार व्यक्त केले

परभणी मार्केट यार्ड मध्ये पांढऱ्या सोन्याला सोन्याला नऊ हजार आठशे रुपयांचा भाव

हिंदू प्रकाश वार्ता/ अशोक पवार



परभणी**कृषी उत्पन्न बाजार समितीच्या टीएमसी मार्केट यार्ड परिसरात दिनांक 19 नोव्हेंबर गुरुवार रोजी पासून खाजगी व्यापाऱ्या मार्फत कापूस खरेदी आरंभ झाला पहिल्या दिवशी कापसाला विक्रमी नऊ हजार आठशे रुपये क्विंटलला भाव मिळाला आहे त्यामुळे शेतकऱ्याला आनंदाचे वातावरणातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे गुरुवारी कापूस खरेदी उद्घाटन प्रसंगी सभापती पंढरीनाथ घुले उपसभापती अजय चव्हाण संचालक गंगाप्रसाद आनेराव गणेशराव घाडगे विनोद लोहगावकर रावसाहेब रेंगे पांडुरंग खिल्लारे रमेशराव देशमुख सोपानराव मोरे सचिव संजय तळणीकर आधी सह व्यापारी उपस्थित होते पहिल्या दिवशी कापसाला विक्रमी भाव देत देण्यात आला नऊ हजार आठशे रुपये प्रति क्विंटल भाव देण्यात आला शेतकऱ्यांत मोठ्या प्रमाणात मार्केट यार्ड कापसाची वाहने आणली होती शेतकऱ्यांच्या गैरसह होऊ नये म्हणून बाजार समितीने शेतकऱ्याच्या सूचना शेतकऱ्यांना सूचना दिले आहेत कापसाची वाहने थेट जिनिंग आवारात न घेता सकाळीच अकरा वाजता वाजेपर्यंत टीएमसी यार्डात क्रमवारीने लावावी जाहीर निलावाची प्रतीक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित सौदा पट्टी घेऊनच वाहने जिनिंग वर घेऊन अजय चव्हाण संचालक मंडळ आणि सचिव संजय तळणीकर यांनी केले आहे.


यावेळी मार्केट यायलाच सर्वप्रथम कापूस घेऊन येणाऱ्या शेतकऱ्या रामेश्वर बाबर राहणार सुर पिंपरी श्रीनिवास टेकाळे राहणार जलालपूर अविनाश जावी तसेच चांगला आणि खराब प्रतिका कापूस वेगवेगळ्या प्रतवारी करून व कोरडा आणि स्वच्छ स्वरूपात विक्रीस आणावा बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात परवानधारक व्यापाऱ्यांना शेतमाल विकावा यासाठी यांच्याकडून अधिकृत हिशोब पटी घ्यावी असे आव्हान श्री कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने करण्यात आले आहे कार्यक्षेत्र स्टील कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी चांगला व स्वच्छ प्रतीचा कापूस यारडातच विकीस आणावा असे आवाहन सभापती पंढरीनाथ घुले व उपसभापती पुके राहणार टाकळी कुंभकरण मुंजा धुमाळ राहणार सुरपिपरी गोविंदराज राजगुरे राहणार नांदखेडा भुजंग कुसळे राहणार दैठणा विठ्ठल मंचक लांबाडे राहणार परभणी राहुल देशमुख राहणार टाकळी कुंभकरण गणेश देशमुख राहणार पेडगाव नवनाथ झाडे राहणार मुरंबा या शेतकरी व व्यापारी कमल मानधने बाळू शेठ शर्मा सुभाष आंबील वादेपुरुषोत्तम झंवर अजय.सरिया भाविन लिंबानी व सीसीआय केंद्रप्रमुख संजय कोकडे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला

जिल्हाधिकारी कार्यालयात दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांना अभिवादन

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी- दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी उपस्थित अधिकारी, कर्मचाऱ्यांना जिल्हाधिकारी यांनी राष्ट्रीय एकात्मता दिनानिमित्त राष्ट्रीय एकात्मतेची शपथ दिली. कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, विभागप्रमुख व कर्मचारी उपस्थित होते.





दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

ग्रामीण विकासाच्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा : खासदार संदिपान भुमरे

केरळमधील कोझिकोड येथे संसदीय स्थायी समितीची बैठक; केंद्राच्या विविध योजनांचा घेतला आढावा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : केंद्र शासनाच्या ग्रामीण विकासाच्या योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचला पाहिजे. गरीब, वंचित, शेतकरी, महिला, आदिवासी आणि बेरोजगार युवकांना शासकीय योजनांचा लाभ घेताना प्रशासकीय अडचणी किंवा अनावश्यक विलंबाचा सामना करावा लागू नये. पात्र लाभार्थ्यांची अडवणूक खपवून घेतली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा खासदार संदिपान भुमरे यांनी दिला.

केरळ राज्यातील कोझिकोड (कालिकत) येथील रामनाट्टुकारा येथे गुरुवारी (दि. १९) संसदेच्या ग्रामीण विकास आणि पंचायती राजविषयक संसदीय स्थायी समितीची बैठक झाली. या बैठकीत समितीचे सदस्य खासदार संदिपान भुमरे यांनी ग्रामीण विकासाच्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीवर भर दिला. बैठकीपूर्वी समितीच्या सदस्यांनी विविध योजनांच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच लाभार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी आणि योजनांमधून मिळणाऱ्या लाभांची माहिती घेतली.

बैठकीत व्हीबी-जी राम जी, दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय ग्रामीण आजीविका अभियान, दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना २.०, प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, प्रधानमंत्री जनमन योजना, सांसद आदर्श ग्राम योजना, दिशा समिती आणि ई-गव्हर्नन्ससह विविध योजनांचा आढावा घेण्यात आला. केरळमधील ग्रामीण विकास आणि पंचायतराज विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी योजनांच्या अंमलबजावणीचे सादरीकरण केले.

शासकीय योजनांसाठी पात्र असूनही कागदपत्रांची पूर्तता, निधी वितरणातील विलंब आणि प्रशासकीय दिरंगाईमुळे अनेक लाभार्थी वंचित राहतात. नागरिकांना शासकीय कार्यालयांचे वारंवार फेरे मारावे लागू नयेत. पात्र व्यक्तींपर्यंत योजनांचा लाभ वेळेत पोहोचविणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे, असे भुमरे यांनी स्पष्ट केले. मंजूर निधीचा योग्य कारणासाठी आणि वेळेत विनियोग व्हावा, कामांचा दर्जा तपासावा आणि लाभार्थी निवडीत पारदर्शकता राखावी, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

ग्रामीण महिलांना स्वयंसहायता गटांच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि युवकांना कौशल्य प्रशिक्षणानंतर रोजगाराच्या संधी मिळवून देणे आवश्यक आहे. तसेच प्रधानमंत्री जनमन योजनेतून आदिवासी समूहांना घरकुल, रस्ते, पाणी, वीज, आरोग्य आणि शिक्षणाच्या सुविधा मिळवून देण्याच्या कामांना गती द्यावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

परभणीचे अधिकारी यांची रेणुका साखर कारखाना, देवेंद्रनगर, ता. पाथरी येथे भेट

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी



परभणी**उस वाहतूक संघटनेच्या वतीने मा. पोलीस अधीक्षक श्री. पंकज कुमावत, सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री. राहुल कुमार, उपविभाग परभणी शहर यांच्या मार्गदर्शनाखाली शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. दीपक दत्तुलवार यांच्या आदेशाने भेट देण्यात आली.

सदर भेटीमध्ये उस ने-आण करणाऱ्या वाहन चालकांचे व व्यवस्थापकांचे मार्गदर्शन करण्यात आले. परभणी-पाथरी तालुक्यातील रेणुका साखर कारखाना, देवेंद्रनगर येथे परभणी शहर वाहतूक शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी भेट दिली.भेटीदरम्यान रेणुका साखर कारखान्याचे व्यवस्थापक अधिकारी श्री. उमाकांत पोळ यांना सोबत घेऊन सर्व चालकांची वाहतूक नियमांबाबत जनजागृती बैठक आयोजित करण्यात आली.

या बैठकीत वाहन चालकांना वाहन चालवताना आवश्यक कागदपत्रे, वाहनाचे इन्शुरन्स, वाहन परवाना, आधारकार्ड व इतर कागदपत्रे सोबत बाळगणे, वाहन चालविताना दारू पिऊन वाहन न चालविणे, वाहनाचा वेग नियंत्रित ठेवणे, तसेच वाहन बंद पडल्यास रस्त्यावर रिफ्लेक्टर लावणे याबाबत सूचना देण्यात आल्या.तसेच वाहनांवर रिफ्लेक्टर बसविणे, वाहन चालकांनी आपला संपर्क क्रमांक व रक्तगट नमूद करणे आणि वाहतुकीचे नियम पाळणे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. रेणुका साखर कारखाना येथे एकूण २३० ट्रॅक्टर, ७० मिनी ट्रॅक्टर व ६२ बैलगाड्या असे एकूण २६२ वाहनांना रिफ्लेक्टर व रेडियम लावण्यात आले आहेत. उर्वरित वाहनांनाही रिफ्लेक्टर व रेडियम लावण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

यावेळी शहर वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक श्री. अविनाश बनाटे, व्यवस्थापक श्री. उमाकांत पोळ, मुख्य शेती अधिकारी श्री. सुनील खडसकर व इतर कर्मचारी उपस्थित होते.

बोराळवाडी येथे आपले सरकार सेवा केंद्राचे उद्घाटन उत्साहात संपन्न



हिंगोली : |मौजे बोराळवाडी येथे ग्रामपंचायत कार्यालयासमोर सुरू करण्यात आलेल्या आपले सरकार सेवा केंद्राचा* उद्घाटन समारंभ उत्साहात पार पडला.

या सेवा केंद्राचे उद्घाटन ग्रामपंचायत अधिकारी श्री. गणेश शिंदे सर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी सरपंच श्री. गजानन कुंडलिक ढाकरे, आपले सरकार सेवा केंद्राचे संचालक श्री. सतीश रामकिसन ढाकरे, सी.एस.सी. संचालक श्री. संतोष हरी वाबळे यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सेवा केंद्राच्या माध्यमातून ग्रामस्थांना विविध शासकीय दाखले, ऑनलाइन सेवा, शासकीय योजनांची माहिती तसेच नागरिकांना आवश्यक असलेल्या विविध डिजिटल सेवा गावातच उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे नागरिकांचा वेळ व प्रवासाचा खर्च वाचून शासकीय सेवा अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे.

ग्रामस्थांनी या केंद्राच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) 2026 अंतर्गत मतदार यादी पुनरीक्षणाचा सुधारित कार्यक्रम जाहीर

गणना प्रपत्रांचे वितरण व संकलन 30 नोव्हेंबरपर्यंत; अंतिम मतदार यादी 22 डिसेंबरला प्रसिद्ध होणार

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी: भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्यात मतदार यादीचे विशेष सखोल पुनरीक्षण (स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन – SIR) २०२६ राबविण्यात येत आहे. या प्रक्रियेंतर्गत अनुपस्थित, स्थलांतरित, मृत व दुबार (ASDD) मतदारांसाठी गणना प्रपत्र (एन्युमरेशन फॉर्म – EF) उपलब्ध करून देणे तसेच गणना प्रपत्रांचे वितरण व संकलन करण्यासाठी मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी १८ नोव्हेंबर २०२६ रोजी सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे.

सुधारित वेळापत्रकानुसार सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी निर्धारित कालमर्यादित कामकाज पूर्ण करावे. तसेच मतदारांनीही विहित मुदतीचे पालन करून मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेत सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांनी केले आहे.

सुधारित वेळापत्रकानुसार गणना प्रपत्र तयार करणे व मुद्रित करण्याची प्रक्रिया १८ नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. गणना प्रपत्रांचे वितरण व संकलन १८ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत करण्यात येणार असून, गणना प्रपत्रे डाऊनलोड करण्याची प्रक्रिया १० डिसेंबरपर्यंत पूर्ण केली जाणार आहे. नोटीस टप्पा तसेच दावे व हरकतींचा निपटारा ३१ ऑगस्ट ते १५ डिसेंबर २०२६ या कालावधीत करण्यात येणार आहे. त्यानंतर २२ डिसेंबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार अनुपस्थित, स्थलांतरित, मृत व दुबार (ASDD) मतदारांची गणना प्रपत्रे ईसीआयनेट (ECINET) प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात आली आहेत. या मतदारांच्या याद्या परभणी जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळावर तसेच संबंधित मतदान केंद्रांवर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.

संबंधित मतदार नोंदणी अधिकारी (ERO) यांच्यामार्फत या मतदारांची गणना प्रपत्रे डाऊनलोड करून त्यांची मुद्रित प्रत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यानुसार संबंधित मतदारांना गणना प्रपत्रांचे वितरण व संकलन करणे तसेच त्याबाबतच्या नोंदी व्यवस्थित जतन करून ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

परभणी जिल्ह्यातील सर्व मतदारांनी विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा. विशेषतः अनुपस्थित, स्थलांतरित, मृत व दुबार मतदारांच्या नोंदींच्या अनुषंगाने संबंधितांनी आपली माहिती तपासून घ्यावी. ज्या मतदारांना गणना प्रपत्र प्राप्त होईल, त्यांनी त्यातील माहिती काळजीपूर्वक तपासून आवश्यक तपशील अचूक भरावेत आणि विहित मुदतीत संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांच्याकडे जमा करावेत. मतदार यादी अचूक, अद्ययावत व त्रुटीविरहित ठेवण्यासाठी नागरिकांचे सहकार्य महत्त्वाचे आहे. कोणताही पात्र मतदार मतदार यादीतून वंचित राहू नये तसेच अपात्र नोंदींची नियमानुसार पडताळणी व्हावी, यासाठी नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

बालविवाहमुक्त परभणी'साठी सामूहिक सहभाग आवश्यक : जिल्हाधिकारी

जिल्ह्यात बालहक्कांच्या संरक्षणासाठी 27 नोव्हेंबरपर्यंत 'बाल हक्क सप्ताह'

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी: 'बालविवाहमुक्त परभणी जिल्हा'च्या निर्मितीसाठी सर्व शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, शैक्षणिक व सामाजिक संस्थांसह नागरिकांनी बालविवाहमुक्त परभणी या अभियानात सक्रिय सामूहिक सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांनी केले आहे.

जिल्ह्यात बालविवाहाचे प्रमाण कमी करून बालकांचे शिक्षण, आरोग्य, संरक्षण आणि सर्वांगीण विकास सुनिश्चित करण्यासाठी 27 नोव्हेंबरपर्यंत 'बाल हक्क सप्ताह' आयोजित करण्यात येत आहे. या सप्ताहाच्या माध्यमातून बालविवाह प्रतिबंध, बालहक्क संरक्षण आणि बालकांना सुरक्षित व सन्मानपूर्वक जीवन जगण्याचा अधिकार याबाबत जिल्हाभर जनजागृती करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व अधिकारी, कर्मचारी, सदस्य व नागरिकांनी https://stopchildmarriage.wcd.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर बालविवाह प्रतिबंधक प्रतिज्ञा घेऊन प्रतिज्ञा प्रमाणपत्र डाउनलोड करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या चौथ्या सर्वेक्षणानुसार परभणी जिल्ह्यात बालविवाहाचे प्रमाण 48 टक्के असल्याचे निदर्शनास आले आहे. हे प्रमाण कमी करण्यासाठी जिल्ह्यात 4 जानेवारी 2003 पासून 'बालविवाह मुक्त परभणी' अभियान राबविण्यात येत आहे. बालविवाहामुळे बालकांचे शिक्षण खंडित होणे, कुपोषण, आरोग्यविषयक समस्या, कौटुंबिक हिंसाचार, शोषण तसेच बालकांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन यांसारख्या गंभीर समस्या निर्माण होतात. त्यामुळे बालविवाह प्रतिबंध अधिनियम, 2006ची प्रभावी अंमलबजावणी करून बालविवाहमुक्त समाज निर्माण करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता आहे.

संयुक्त राष्ट्र महासभेने 5 ऑक्टोबर 2026 रोजी ठराव मंजूर करून दरवर्षी 27 नोव्हेंबर हा दिवस बालविवाह व सक्तीच्या विवाह निर्मूलनासाठी आंतरराष्ट्रीय दिवस म्हणून घोषित केला आहे. या पार्श्वभूमीवर महिला व बालविकास विभागांतर्गत जिल्ह्यात 18 ते 27 नोव्हेंबरदरम्यान बाल हक्क सप्ताह राबविण्यात येत असून, 27 नोव्हेंबर रोजी आंतरराष्ट्रीय दिनानिमित्त विशेष जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. सप्ताहादरम्यान शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, शाळा, महाविद्यालये, बचत गट आणि विविध समुदायांच्या सहभागातून बालहक्क, बालविवाह प्रतिबंध व बालसंरक्षणासंदर्भात जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येणार आहेत. बालकांना शिक्षण, आरोग्य, संरक्षण, विकास आणि सुरक्षित वातावरणात जगण्याचा अधिकार याबाबत समाजात जागरूकता निर्माण करण्यावर भर देण्यात येणार आहे.

बालविवाह प्रतिबंधाबाबत जनजागृती करण्यासाठी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयाने 'बालविवाह मुक्त परभणी' अभियानांतर्गत लघुचित्रफीत तयार केली आहे. ही लघुचित्रफीत 27 नोव्हेंबर 2026 रोजी एनआयसी परभणीच्या माध्यमातून जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी प्रसारित करण्यात येणार आहे. यामुळे बालविवाहाचे दुष्परिणाम आणि बालविवाह प्रतिबंधक कायद्याविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण होण्यास मदत होणार आहे.

सप्ताहांतर्गत विविध विभागांनी राबविलेल्या उपक्रमांचा अहवाल व छायाचित्रांसह 30 नोव्हेंबर 2026 पर्यंत जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, परभणी यांच्याकडे सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांनी दिले आहेत.

हर्सूल कचरा डेपोतील आगीनंतर अनिल मकरिये यांच्याकडून पाहणी

आगीची पुनरावृत्ती टाळण्यासाठी खबरदारीच्या उपाययोजना करण्याचे अधिकाऱ्यांना निर्देश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : हर्सूल येथील कचरा प्रक्रिया प्रकल्पाला आग लागल्याच्या घटनेनंतर महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी आग लागलेल्या परिसराची पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला. तसेच संबंधित अधिकाऱ्यांकडून घटनेची माहिती जाणून घेत आवश्यक त्या सूचना दिल्या.

शहरातील इतर कचरा डेपोच्या ठिकाणीही अशा प्रकारच्या आगीच्या घटना घडू नयेत, यासाठी योग्य नियोजन करण्याचे निर्देश मकरिये यांनी दिले. कचरा डेपो परिसरात सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, आग प्रतिबंधक यंत्रणा सज्ज ठेवावी आणि भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे त्यांनी सांगितले.

शहरातील स्वच्छता आणि नागरिकांची सुरक्षितता महत्त्वाची असून, महानगरपालिका प्रशासनाने कचरा प्रक्रिया केंद्रांच्या ठिकाणी नियमित देखरेख ठेवावी. तसेच संभाव्य धोके टाळण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, अशा सूचनाही त्यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिल्या.

'वोट बचाओ – देश बचाओ' अभियानांतर्गत पनवेलमध्ये काँग्रेसची महत्त्वपूर्ण आढावा बैठक संपन्न

पाचशेहून अधिक नवीन BLA-2 नोंदणी; आगामी निवडणुका स्वबळावर लढण्याची काँग्रेसची तयारी – राणी अग्रवाल

उरण दि १९()अखिल भारतीय काँग्रेस कमिटी (AICC) व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या आदेशानुसार 'वोट बचाओ – देश बचाओ' अभियानांतर्गत सोमवार, दिनांक १६ नोव्हेंबर २०२६ रोजी काँग्रेस भवन, पनवेल येथे पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीची महत्त्वपूर्ण आढावा बैठक उत्साहात पार पडली.

AICC प्रभारी तथा जोधपूरच्या माजी आमदार मनीषा पंवार आणि मावळ लोकसभा मतदारसंघाच्या प्रभारी राणी अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली, पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्ष डॉ. श्रुती शाम म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत डॉ. श्रुती शाम म्हात्रे यांनी पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या मागील तीन महिन्यांच्या संघटनात्मक कामकाजाचा सविस्तर अहवाल उपस्थित मान्यवरांसमोर सादर केला. गेल्या तीन महिन्यांत सर्व ब्लॉक अध्यक्ष, जिल्हा पदाधिकारी, विभागीय अध्यक्ष आणि कार्यकर्त्यांच्या सामूहिक प्रयत्नांतून पाचशेहून अधिक नवीन BLA-2 प्रतिनिधींची नोंदणी करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच प्रदेश काँग्रेस कमिटीने दिलेले निर्देश आणि पक्षाचे विविध कार्यक्रम पनवेलमध्ये यशस्वीपणे राबविण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले. या कामगिरीबद्दल त्यांनी सर्व ब्लॉक अध्यक्ष, पदाधिकारी, विविध विभागांचे अध्यक्ष आणि कार्यकर्त्यांचे विशेष आभार मानले.

यावेळी मार्गदर्शन करताना मावळ लोकसभा प्रभारी राणी अग्रवाल यांनी आगामी काळात काँग्रेस पक्ष राज्यभरात संघटनात्मक ताकद वाढवून आगामी निवडणुका स्वबळावर लढण्याच्या तयारीत असल्याचे स्पष्ट केले. पक्षाच्या प्रत्येक कार्यकर्त्याने बूथस्तरावर संघटना मजबूत करण्यासाठी सक्रियपणे काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले.



AICC प्रभारी मनीषा पंवार यांनी आपल्या मार्गदर्शनात सत्तेत टिकून राहण्यासाठी भाजपकडून गल्लीपासून दिल्लीपर्यंत निवडणूक प्रक्रियेत कथित गैरप्रकार कशा प्रकारे केले जात आहेत, याची विविध उदाहरणे देत सविस्तर भूमिका मांडली. लोकशाही आणि मतदारांच्या मतदानाच्या अधिकाराचे संरक्षण करण्यासाठी काँग्रेस कार्यकर्त्यांनी सजग राहून 'वोट बचाओ – देश बचाओ' अभियान प्रभावीपणे राबवावे, असे आवाहन त्यांनी केले.

बैठकीत १५ ते २२ नोव्हेंबरदरम्यान होणाऱ्या ब्लॉकस्तरीय चौपाल बैठकांचे नियोजन, SIR प्रक्रियेबाबत जनजागृती, आगामी संघटनात्मक कार्यक्रम तसेच २५ व २६ नोव्हेंबर रोजी रायगड किल्ल्यावर आयोजित संविधान दिनाच्या ऐतिहासिक कार्यक्रमाबाबत चर्चा करण्यात आली. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या २०० व्या जयंती वर्षानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे नियोजनही यावेळी करण्यात आले.

या बैठकीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे युवा नेते योगेश दिवटे, प्रवीण जॉन्स, जेकब थॉमस आणि शाहरुख शेख यांनी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. त्यांच्या पक्षप्रवेशामुळे पनवेलमधील काँग्रेस संघटनेला अधिक बळ मिळणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या बैठकीस पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे माजी जिल्हाध्यक्ष सुदाम पाटील, नगरसेवक हरेश केणी, नगरसेवक लतीफ शेख, मिलिंद पाडगावकर, डॉ. मनीष पाटील, पिंपरी चिंचवड जिल्हा अध्यक्ष नितीन बनसोडे , नगरसेवक शशिकला सिंग, हेमराज म्हात्रे, संतोष पवार , महेश शिंदे , चेतन म्हात्रे, सुधीर मोरे, जोस जेम्स, अरुण कुंभार, डॉ. अमित दवे, सागर पगारे, सुरेश पाटील, अखिल अधिकारी, लतीफ नालखंडे, बबन केणी, डॉ. स्वप्नील पवार, वर्षाताई शिखरे, राजेश रंजीत, अनिस इद्रेसी यांच्यासह प्रदेश पदाधिकारी, जिल्हा पदाधिकारी, आजी-माजी लोकप्रतिनिधी, सर्व ब्लॉक अध्यक्ष, विविध विभागांचे अध्यक्ष आणि मोठ्या संख्येने काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे प्रवक्ते अजय कापरे यांनी केले.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911